साहसे श्रीः प्रतिवसति ।

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे

# अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले

ता.अकोले, जि.अहमदनगर, पिन ४२२६०१. (महाराष्ट्र) दूरध्वनी : (०२४२४) २२१२४८.

NAAC Accredited B++




मंगल देशा ! पवित्र देशा ! महाराष्ट्र देशा ।
प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्र देशा ॥

– गोविंदाग्रज

# अगस्त्य

## २००९-१०

संपादक : प्रा.डॉ.विजय बाणकर

प्रकाशक : प्राचार्य रमेशचंद्र खांडगे

ऽसोऽहंऽ

# From the Editor's Desk....

1.

The Editor is to
Put it before them briefly so they will read it,
Clearly so they will appreciate it,
Picturesquely so they will remember it,
And above all,
Accurately so they will be guided by its light.

- Joseph Pulitzer

&

2.

The Reader is to
Appreciate a wonderful thing.
It makes what is excellent
In others belong to us as well.

- Voltaire



Dr. V.K.Bankar
Editor

साहसे श्रीः प्रतिवसति ।

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे

# अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले

ता.अकोले, जि.अहमदनगर, (महाराष्ट्र राज्य)

दूरध्वनी : (०२४२४) २२१२४८.

# अगस्त्य

नियतकालिक

२००९ – २०१०

प्रकाशक

**प्राचार्य रमेशचंद्र खांडगे**

संपादक

**प्रा.डॉ.विजय बाणकर**

**प्रकाशक -**
प्राचार्य रमेशचंद्र खांडगे
अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान
महाविद्यालय, अकोले, जि.अहमदनगर

**संपादक -**
प्रा.डॉ.विजय बाणकर

**संपादक मंडळ -**
वरिष्ठ महाविद्यालय
प्रा.डॉ.विजय बाणकर, इनचार्ज कला शाखा
प्रा.डॉ.अविनाश झांबरे, विद्यार्थी कल्याण अधिकारी
प्रा.डॉ.अकीला शेख, प्रमुख, हिंदी विभाग
प्रा.संजय पगारे, व्याख्याता, इंग्रजी विभाग
प्रा.रामकृष्ण देशमुख, इनचार्ज वाणिज्य शाखा

कनिष्ठ महाविद्यालय
प्रा.डॉ.सुनिल शिंदे, मराठी विभाग
प्रा.ओंकार राठी, मराठी विभाग
प्रा.बाळासाहेब शेटे, हिंदी विभाग
प्रा.नंदा डफाळ, मराठी विभाग
प्रा.रुपाली रासने, इंग्रजी विभाग

विशेष सहकार्य
प्रा.यासीन सय्यद, राज्यशास्त्र विभाग (वरिष्ठ महाविद्यालय)
प्रा.विवेक वाकचौरे, रसायनशास्त्र विभाग (कनिष्ठ महाविद्यालय)

**अक्षर जुळणी -**
श्री.समाधान कुलकर्णी, नासिक

**मुखपृष्ठ व फोटो सेटिंग -**
मास्टर श्रेयस

**अंतरंग सजावट व दोष दुरुस्ती -**
श्री.नितिन जोशी

**मुद्रक -**
मे.विजय ऑफसेट,अकोले
दूरध्वनी : (०२४२४) २२१७८६

## वार्षिक नियतकालिक

२००९-२०१०

वि प्रेस अँड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स् नियम ८, फॉर्म ४ प्रमाणे आवश्यक माहिती

**- प्रकाशन स्थळ -**

अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले, जि.अहमदनगर

**प्रकाशन काळ - वार्षिक**

- प्रकाशक -

**प्राचार्य रमेशचंद्र खांडगे**

अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले, जि.अहमदनगर

- संपादक -

प्रा.डॉ.विजय बाणकर

राष्ट्रयत्त्व - भारतीय

- मालकी -

अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले, जि.अहमदनगर

मी.प्रा.रमेशचंद्र धोंडिबा खांडगे जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या समजूतीप्रमाणे बरोबर आहे.

**प्राचार्य रमेशचंद्र खांडगे, प्रकाशक**

**सदर अंकात प्रसिद्ध करण्यांत आलेल्या साहित्यातील मतांशी संपादक मंडळ व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.**

अनंत विश्वाशी अखंड एकरुप असलेले

**श्रीसद्‌गुरु**

आणि वाचकरुपी

**जनता जनार्दन**

यांचे चरणी हा

अंक

समर्पित.....!

।। श्रीअगस्ति प्रसन्न ।।



।। ॐ कुंभोद्भवाय विद्महे भर्तृहरि भ्रात्रे च धीमहि
तन्नो अगस्तिः प्रचोदयात् ।।

# विश्वस्त मंडळ, अ.ता.ए.सोसायटी

कार्यकारी विश्वस्त




**मा.आमदार मधुकररावजी पिचड**

## विश्वस्त




मा.लालचंदजी शहा



मा.भाऊसाहेब हांडे



मा.दशरथ पा. सावंत



मा.प्रेमानंद रुपवते



मा.डॉ.बी.जी.बंगाळ



मा.सिताराम पा. गायकर


# कार्यकारिणी, अ.ता.ए.सोसायटी, अकोले.

अध्यक्ष



श्री.जे.डी.आंबरे पाटील

उपाध्यक्ष



ॲड.श्री.वसंतराव मनकर

सेक्रेटरी



श्री.यशवंतराव अभाळे

सहसेक्रेटरी



डॉ.श्री.डी.के.सहाणे

खजिनदार



ॲड.श्री.के.बी.हांडे

विस्तार प्रमुख



श्री.मीनानाथ पांडे

सदस्य



श्री.हामीदभाई फारुकी

सदस्य



श्री.मधुकरराव सोनवणे

सदस्य



श्री.अशोकराव भांगरे

सदस्य




श्री.आनंदराव नवले

सदस्य



श्री.सुधाकरराव देशमुख

सदस्य



श्री.पुंजा पा. आवारी

सदस्य



श्री.निवृत्ती साबळे

सदस्य



श्री.धनंजय संत

सदस्या



सौ.कल्पनाताई सुरपुरिया

सदस्या



सौ.आशाताई पापळ



# प्राचार्यांचे मनोगत

**२०२० साली .......
राज्यातील एक
आदर्श व सर्व शैक्षणिक सुविधांनी युक्त
असे महाविद्यालय म्हणून
अकोले महाविद्यालय ओळखले जाईल.**

Prof. R.D.Khandge, Principal

१९७२ साली अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली १९७४ साली आपले महाविद्यालय सुरु झाले. गेल्या ३८ वर्षातला मी एक साक्षीदार आहे. त्या अनुषंगाने या मनोगतातून आजवरच्या वाटचालीचा व पुढील १० वर्षांचे व्हिजन माझ्या शब्दात मांडण्याचा हा प्रयत्न, जेणेकरुन पुढील २० वर्षातील वाटचालीसंबंधी व्यापक पातळीवर विचार प्रक्रिया सुरु व्हावी, ही अपेक्षा.

अकोले तालुक्यातील शिक्षणाबाबत आजचा आढावा जर घेतला तर तालुक्यात दोन अनुदानित महाविद्यालये, दोन विना अनुदानित महाविद्यालये सुमारे एक डझन उच्च माध्यमिक विद्यालये व सत्तर ते पंचाहत्तर माध्यमिक विद्यालये आहेत. विना अनुदान महाविद्यालयातून उच्च शिक्षणाबाबत काही अपेक्षा करणे चुकीचे आहे. त्यामुळे सन १९७४ साली स्थापन झालेल्या अगस्ती कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते महाविद्यालय व सन १९९५ साली स्थापन झालेल्या राजूर येथील महाविद्यालयाचा विचार करावा लागेल.

एकविसाव्या शतकात प्रवेश केल्यानंतरही ग्रामीण भागातील बहुतांश महाविद्यालये ही पारंपरिक कला, वाणिज्य व विज्ञान व त्याच विद्याशाखेतील पदवी व पदव्युत्तर शिक्षणाचे अभ्यासक्रम राबविण्यात धन्यता मानत होती. महाराष्ट्राचे ऑक्सफर्ड समजले जाणारे विद्यापीठही त्याला फारसे अपवाद नव्हते. त्याच्या उलट विना अनुदान तत्त्वावरही इंजिनिअरींग, मेडीकल, फार्मसी, आर्किटेक्चर इ. महाविद्यालये मात्र आपल्या शिक्षणसंस्था या व्यावसायिक पद्धतीने चालवून काही धनदांडग्यांना आज बाजारात ज्याची आवश्यकता आहे ते शिक्षण देण्याची व्यवस्था करीत होती.

दुर्दैवाने हे नवीन वारे आपल्या तालुक्यात अद्यापपर्यंतही पोहोचलेले नाहीत. आजही अकोले महाविद्यालयातील बीसीए, बीबीए, बीसीएस हे अभ्यासक्रम सोडले तर व्यवसायाभिमुख कोर्सेसची परिस्थिती अत्यंत नकारात्मक आहे. १९८६ साली स्थापन झालेल्या आयटीआय मध्ये सुद्धा दरम्यानच्या काळातील जागतिक मंदीमुळे एक प्रकारची अवकळा प्राप्त झाली. तात्पर्य, उच्च शिक्षण व व्यावसायिक कोर्सेसची आजची तालुक्यातील स्थिती ही तुलनेने अत्यंत वाईट अशीच आहे.

असे होण्याला काही नैसर्गिक व काही मानवनिर्मित कारणे आहेत...............

पैकी एक महत्त्वाचे कारण नमूद करावेसे वाटते, अकोले तालुक्यातील बव्हंशी पालक व विद्यार्थी फक्त वीस किलोमीटर लांब गेल्यानंतर तालुक्याबाहेरच्या शिक्षणसंस्थांमध्ये सर्व प्रकारची फी, देणगी निमूटपणे भरतात. मात्र अकोले तालुक्यात असा जर प्रयत्न कुणी केला तर गरीबी, मागासलेपणा, दारिद्र्य यावर प्रचंड भाषणे होतात व ज्या काही शिक्षणाच्या

नवीन दिशा उजळू पहात असतात त्यांनाही परत अंधाराच्या सावटाखाली जावे लागते. अशा आंदोलनाला सर्वसामान्य पालक व विद्यार्थी पाठींबा देत नाहीत. हे एका बाजूला मान्य करीत असताना हेही वास्तव स्विकारले पाहिजे की याच्याविरुद्ध कुणी आवाजही उठवित नाहीत. 'मौनम् सर्वार्थ साधनम्' हीच वृत्ती. जणू काही शिक्षणक्षेत्र म्हणजे बाजारपेठच आहे. अकोल्यात असेल तर उधारी व रोख असेल तर संगमनेर. या सगळ्या कारणांना ओलांडून तालुक्यात उच्च शिक्षणाचा विचार करणे असंभव आहे. हे सगळ्यांना मान्य करावे लागेल.

गेल्या दोन-तीन वर्षात ही परिस्थिती थोडी थोडी बदलू लागली आहे. हे जरुर मान्य करीत असताना दुसऱ्या बाजूला अनेक नवीन अडचणी उच्च शिक्षण विस्तार व व्यावसायिक अभ्याक्रमापुढे उभे आहेत याचे विवेचन करावे लागेल. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै.वसंतदादा पाटील यांनी विना अनुदान धोरण जाहीर केल्यानंतर महाराष्ट्रभर जिल्ह्या-जिल्ह्यातून व तालुक्यातून असंख्य कार्यकर्तेपुढे आले व त्यांनी आपापल्या जिल्ह्यात, तालुक्यात उच्च शैक्षणिक संस्थांचे जाळेच उभे केले. सुरुवातीला विविध विद्यापीठे व त्या त्या विद्याशाखातील शिखरसंस्था यांचे धोरण उदार मतवादी राहिल्याने या शैक्षणिक संस्था उभारण्यामध्ये फारशा तांत्रिक व आर्थिक अडचणी या शिक्षणसम्राटांना आल्या नाहीत. आज मात्र संबंधित विद्याशाखांना लागणाऱ्या विद्यार्थी, ग्रंथालये, प्रयोगशाळा, क्रीडांगणे, संगणक प्रयोगशाळा इ. सुविधा व त्यामध्ये शिकविणारे शिक्षकवृंद याबद्दलच्या अटी व त्यांचे मानदंड व त्याहून अर्ज करताना भरावी लागणारी काही लाखातील फी यामुळे अलिकडे कोणती एखादी विद्याशाखा सुरु करावयाची म्हणजे मोठमोठ्या शिक्षणसम्राटांचा जीव मेटाकुटीला येतो तर सेवाभावी संस्थांना असे व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करणे हे स्वप्नरंजनच वाटू लागते. आपल्या तालुक्यात असे स्वप्नरंजन करणे हा तर जणू काही गुन्हाच मानला गेला व या गोष्टी आपला आटोक्यातील नाहीत म्हणून आपण गरीबीवर भाषणे न केलेलीच बरी आणि आपल्या तालुक्यातील गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना इतर शिक्षण सम्राटांच्या कार्यालयासमोर रांगा लावण्यातच आपण धन्यता मानली.

एका बाजूला पारंपरिक शिक्षण पूर्णपणे कालबाह्य ठरले आहे. व्यावसायिक शिक्षणाची सुविधा नाही आणि ज्या अभ्यासक्रमांच्या भरवशावर शैक्षणिक संस्था उभ्या केल्या गेल्या त्यांनाही अलिकडे विद्यार्थी मिळविण्यासाठी गावोगाव फिरावे लागते असे वास्तव आहे. त्यामुळे एका दमात फार्मसी, इंजिनिअरींग, मेडीकल या अभ्यासक्रमांची नावे घेताना जरी एखादा चमत्कार होऊन या संस्था तालुक्यात पुरेसे विद्यार्थी मिळतीलच की नाही अशीही शंकेची पाल मनात चुकचुकते. त्यामुळे तालुक्यात आजही उच्चशिक्षण विस्तार आणि व्यावसायिक अभ्यासक्रम याबाबतीत आपण बाबा आदमच्या काळात आहोत.

गेल्या दहा वर्षात जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे शिक्षणाची व्याख्या देखील पूर्णपणे बदलून गेली आहे.विशेषतःआय.टी.व बी.टी हे दोन अभ्यासक्रम म्हणजे हमखास उत्पन्नाची व गलेलठ्ठ पगाराची हमी देणारेच अभ्यासक्रम आहेत.पण त्यांची उभारणी करण्यासाठी वर सांगितल्याप्रमाणे काही कोट्यावधी रुपयांचा भांडवली खर्च करणे हे ज्यांना शक्य आहे तीच मंडळी येथेही शर्यतीमध्ये पुढे आहेत.वरील सर्व विवेचन हे नकारात्मक वाटते पण हे वास्तव आहे हे अमान्य करता येणार नाही.या सर्व अडचणी जर नसत्या तर आज तालुक्यात एखादे इंजिनियरिंग कॉलेज,एखादे मेडिकल, एखादे तंत्रनिकेतन, एक-दोन आय्.टी.आय्, एखादे फार्मसी कॉलेज व इतर अनेक कोर्सस सुरू व्हावयास हवे होते परंतु उशीर का होईना तालुक्यात स्वागतार्ह बदल होत आहेत.अकोले महाविद्यालयाने बी.सी.ए; बी.बी.ए; बी.सी.एस्. याचबरोबर ऑर्गनिक केमिस्ट्रीमधील पदव्युत्तर शिक्षण यांची सुविधा केली आहे.यातून मिळणाऱ्या कायदेशीर उत्पन्नातून पुढील प्रगती करणे शक्य आहे.

मात्र हे अभ्यासक्रम आणीत असतांना पुढील किमान दहा ते वीस वर्षात जागतिक पातळीवर कोणत्या अभ्यासक्रमांना मागणी असणार आहे याचाही विचार सगळ्यांनी करणे गरजेचे आहे. जागतिकीकरणामुळे व्यवसाय, नोकरी, नोकरीचे स्थळ, पगार या सर्वांच्या व्याख्या आमूलाग्र बदलून गेल्या आहेत. इतकेच नव्हे तर पूर्वी ज्यांचा कुणी विचारही केला नसेल अशा अनेक करिअरच्या संधी या उपलब्ध झालेल्या आहेत. त्यामुळे जो या बदलामध्ये नवीन तंत्रज्ञानाचा अभ्यास करेल तोच तरेल. एक दोन पदव्या संपादन करुन निवृत्तीपर्यंत त्याच भांडवलावर नोकऱ्या करणाऱ्यांचे दिवस भूतकाळात जमा झालेले आहेत. इव्हेंट मॅनेजमेंट, डिझास्टर मॅनेजमेंट, हॉस्पिटल मॅनेजमेंट, हॉस्पिटॅलिटी, इन्शुरन्स, नर्सिंग इत्यादी अनेक विविध क्षेत्रामध्ये लक्षावधी नोकरीच्या संधी तरुणतरुणींकरीता उपलब्ध आहेत. पुणे विद्यापीठासारखी विद्यापीठे सुद्धा याबाबतीत मार्गदर्शन करणाऱ्या अनेक व्यावसायिक संस्थांचे सहकार्य घेत आहे. त्यामुळे कोणत्याही शिक्षणसंस्थेची जबाबदारी आहे की, काळाच्या मागे न

राहता पायाभूत अभ्यासक्रम म्हणून इंजिनिअरींग, फार्मसी, मेडीकल आर्किटेक्चर हे अभ्यासक्रम महाविद्यालयात सुरु करावेत पण साथ साथ मॅनेजमेंट, कॉम्प्युटर बायोटेक्नॉलॉजी, जीन टेक्नॉलॉजी, वाईन टेक्नॉलॉजी अशा असंख्य अभ्यासक्रमांचे दरवाजे तालुक्यातील विद्यार्थ्याला खुले करुन दिले पाहिजेत.

तालुक्यातील पालकांनी व विद्यार्थ्यांनी या सर्व अभ्यासक्रमांची विद्यापीठाने व शासनाने निर्धारित केलेली विहित फी जरी एका हप्त्यात देण्याची मानसिकता ठेवली तरी हे सर्व अभ्यासक्रम आपल्या तालुक्यात सुरु करणे सहज शक्य आहे. गमतीची गोष्ट अशी की, व्यक्तिगत पातळीवर देखील अनेक संस्थांनी प्रवाहाच्या बरोबर जात बाजारभावात डी.एड. व बी.एड. ची दुकाने खोललेली आहेत. पण त्यातही काही दिवसांनी जे गुणवत्ता देतील तेच टिकतील एवढेच नमूद करु इच्छितो.

आणखी एका बाबतीत पालकांची मानसिकता बदलली पाहिजे. बारावीनंतर डी.एड. व मुलींना शक्यतो आर्ट्स व तेही गावात किंवा गावाजवळ कॉलेज असेल तर ! ही पारंपरिक विचारसरणी बदलण्याची गरज आहे. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत तर एअर होस्टेस पासून नर्सिंगपर्यंत व एम.पी.एस्.सी. पासून कॉलसेंटरपर्यंत असंख्य दालने उपलब्ध आहेत. गरज आहे ती पालकांची मानसिकता बदलण्याची. मुलगा-मुलगी भेद न मानता मुलगी जरी असली तरी तिला भारतातच नव्हे तर भारताबाहेरही पाठविण्याची पालकांनी तयारी ठेवणे गरजेचे आहे. आदिवासी विभागात जे काही परंपरागत ज्ञान आहे, त्याही चर्चेत मला फारसे तथ्य वाटत नाही. तोच तोच तथाकथित आयुर्वेद व तोच तोच हिरड्यांपासून रंग काढणे ही चर्चादेखील मी गेली चाळीसवर्षेतालुक्यात ऐकत आहे. त्यातील काही तांत्रिक अडचणी दूर करता येणे शक्य होते. पण 'सी' झोन चा 'डी' झोन करुन तालुक्यात एखादी एमआयडीसी उभी राहत नाही तोपर्यंत ही चर्चा वांझ व निरर्थक आहे असे मला वाटते. पर्यटन व्यवसायाला मात्र तालुक्यात चांगलाच वाव आहे व त्यादृष्टीने पर्यटनविषयक अभ्यासक्रम किंवा आयुर्वेदातील एखादी रसशाळा किंवा अर्कशाळा उभारता येणे शक्य आहे. पण त्या अभ्यासक्रमांना देखील आवश्यक असणारे इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध नाही ही रड आजही आहेच.

मात्र आदिवासी विद्यार्थ्यांनी जडीबुटीच विकावी व हिरड्याची उत्पादने निर्माण करावीत म्हणजे तालुका सोडून जाऊ नये असा सल्ला मी त्यांना देणार नाही. 'स्काय इज द लिमिट' या न्यायाने त्यांना अनेक संधी उपलब्ध आहेत. उलट या संधीचा फायदा घेण्यामध्ये आदिवासी विद्यार्थीच कमी पडतात असा माझा व्यवहारातील अनुभव आहे. एअर इंडियापासून तर प्राथमिक शाळेपर्यंत अनेक ठिकाणी आदिवासींचा अनुशेष आजही बाकी आहे. हे वास्तव नजरेआड करुन कसे चालेल? उरला एकमेव प्रश्न तो गरीब आदिवासी विद्यार्थी व महागडे व्यावसायिक कोर्सेस यातील अंतरच माझ्या मते हे अंतरही आता उरलेले नाही. बहुतांशी आदिवासीच नव्हे तर ओबीसी विद्यार्थ्यांना देखील शासनाकडून सर्वप्रकारच्या फीमध्ये सुविधा उपलब्ध आहेत. अनेक बँकांनी देखील कर्जाच्या योजना सुरु केलेल्या आहेत. यातूनही एखादा गुणवंत आदिवासी विद्यार्थी जर शिक्षणापासून वंचित रहात असेल तर त्याची जबाबदारी घेण्याची मानसिकता ही समाजाने ठेवली पाहिजे.

२०२० साली अकोले महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्याकडे आजचा कॉम्प्युटर किंवा लॅपटॉप किंवा त्यावेळी त्यातील जे अत्याधुनिक साधन जे असेल ते असेल. तालुक्यातील सर्व शैक्षणिक संस्था या एकमेकांशी इंटरनेटने जोडलेल्या असतील. एवढेच नव्हे तर काही ठिकाणी ट्रीपल कनेक्टीव्हीटी सुद्धा उपलब्ध असेल. विद्यार्थ्यांमधील सर्व चर्चा ही आंतरराष्ट्रीय पातळीवरची असेल. जगाच्या कानाकोपऱ्यातून असंख्य अकोले महाविद्यालयात विविध अभ्यासक्रमांचे शिक्षण घेत असतील. अद्ययावत स्टेडीयम, प्रयोगशाळा, ग्रंथालय, त्याचबरोबर ई-लर्निंगचा प्रभाव असेल आणि अशी शक्यता आहे की, वर्गात एकही विद्यार्थी नसेल. जो तो आपल्या घरी बसून आपापल्या सोयीनुसार व आवडीनुसार इंटरनेटवर व संगणकावर किंवा लॅपटॉपवर शिक्षणप्रक्रियेत सहभागी होत असेल. २०२० साली अकोले महाविद्यालयातील सर्व प्रवेश हे ऑनलाईन पद्धतीने झालेले असतील आणि राज्यातील एक आदर्श व सर्व शैक्षणिक सुविधांनी युक्त असे महाविद्यालय म्हणून अकोले महाविद्यालयातील हे ओळखले जाईल.

**– प्राचार्य रमेशचंद्र खांडगे**

# अंतरंग


१. प्राचार्यांचे मनोगत
२. मराठी विभाग
३. इंग्रजी विभाग
४. हिंदी विभाग
५. ग्रंथालय
६. वरिष्ठ महाविद्यालय अहवाल
७. कनिष्ठ महाविद्यालय अहवाल
८. समिक्षा
९. श्रद्धांजली
१० व्यवस्थापन समिती
११. प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी

